**महाराष्ट्र शासन**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
१६ वा माळा, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दूरध्वनी क्र.०२२ २२८४५९१९ Email-gauri.pawar@nic.in

---

क्र. संकीर्ण /२०१६-प्र.क्र.१६१/टेक्स-२ दिनांक:- २६ मार्च, २०१८

e.29804*82

26 APR 2018
402

प्रति,
**संचालक (वस्त्रोद्योग),**
**वस्त्रोद्योग संचालनालय,**
**नागपूर.**

विषय:- **राज्यातील साध्या यंत्रमागधारकांना कर्जावरील व्याजात पाच टक्के सवलत अनुदान देण्याबाबत**

**महोदय,**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र.१६१/टेक्स-२, दि. ५ डिसेंबर २०१७ मध्ये कर्जावरील व्याज अदा करण्यासाठी यंत्रमाग धारकाची पात्रता ठरविताना सदर शासन निर्णयातील पात्र साधे यंत्रमागधारक या शिर्षाखाली खालील प्रमाणे नमुद करण्यात आले आहे:-

२. राज्यातील यंत्रमागधारकांपैकी साध्या यंत्रमागधारकांनी या निर्णयापुर्वी बँका किंवा वित्तीय संस्थांकडुन यंत्रमागाकरीता घेतलेले कर्ज हे ५% व्याजदर सवलतीकरीता निर्णयानंतर ५ वर्ष अथवा संबंधित यंत्रमागधारकांचे कर्जाची परतफेड होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत पात्र राहिल. इतर बांधकाम किंवा जमिनीकरीता घेतलेल्या कर्जाची रक्कम ५% व्याजदर सवलतीकरीता पात्र असणार नाही.

३. वरील मजकुरातील बँका किंवा वित्तीयसंस्थांकडुन **"यंत्रमागाकरीता"** घेतलेले कर्ज असे जे नमुद करण्यात आलेले आहे त्याबाबत बँकांकडून यंत्रमागाकरीता म्हणजे यंत्रमाग खरेदीकरीता घेतलेले कर्ज असा अर्थ काढला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब याबाबत पुढील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे-

| अ. क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | साध्या यंत्रमागधारकांनी या निर्णयापुर्वी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून यंत्रमागाकरीता घेतलेले कर्ज हे ५% व्याजदरासाठी शासन निर्णयामधील तरतुदीप्रमाणे पात्र राहिल. यामधील "यंत्रमागाकरीता" म्हणजे नेमके कोणते कर्ज? | यंत्रमागाकरीता घेतलेले कर्ज म्हणजे यंत्रमाग व्यवसाय चालविण्यासाठी घेतलेले कोणत्याही प्रकारचे कर्ज (जमिन आणि बांधकाम वगळून) |

आपली,

(गौरी रा.म्हस्के)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत-
१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा. मंत्री (वित्त व नियोजन, वने) यांचे खाजगी सचिव